# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक: 05.04.2024** **वार: शुक्रवार**

---

**<u>मतदान यंत्र</u>**

पुणे जिल्ह्यातील मावळ, पुणे, बारामती आणि शिरुर लोकसभा मतदारसंघाच्या निवडणूकीसाठी जिल्हाधिकारी आणि जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. सुहास दिवसे यांच्या उपस्थितीत ८ हजार ३८२ मतदान केंद्रांसाठीच्या ११ हजार ८९८ मतदान यंत्रांचं जिल्हास्तरीय रँडमायझेशन, म्हणजेच सरमिसळ प्रकिया आज करण्यात आली. तत्पूर्वी दिवसे यांनी राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींना सरमिसळ प्रक्रियेची माहिती दिली. त्या-त्या विधानसभा मतदारसंघात देखील मतदान यंत्रांची सरमिसळ प्रक्रिया करण्यात येणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

दरम्यान जिल्ह्यातील मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी जनजागृती उपक्रम राबवण्यात येत आहेत. पिंपरी चिंचवड अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी आज १०० टक्के मतदानाचा संकल्प केला.

**<u>रोकड</u>**

निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आदर्श आचारसंहितेच्या अंमलबजावणीसाठी जिल्ह्याच्या विविध भागात सध्या पोलीस प्रशासन आणि निवडणूक यंत्रणेची भरारी पथकं तैनात आहेत. कोणत्याही व्यक्तीजवळ रोख रक्कम सापडल्यास ती जप्त करण्याचा अधिकार या भरारी पथकांना देण्यात आला आहे. त्यामुळे आचारसंहितेच्या काळात नागरिकांनी 50 हजाराहून अधिक रोख रक्कम जवळ बाळगू नये असं आवाहन प्रशासनाने केलं आहे.

**<u>भाजपा</u>**

पुणे लोकसभा मतदारसंघातील भाजपाचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करण्यासाठी भाजपाच्या वर्धापन दिनानिमित्त उद्या आणि परवा 'घर चलो अभियान' राबवण्यात येणार आहे. यात १० हजारपेक्षा जास्त कार्यकर्ते सहभागी होणार असल्याची माहिती पुणे शहराध्यक्ष धीरज घाटे यांनी आज पत्रकार परिषदेत दिली.

**<u>शरद पवार</u>**

राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षानं सुरेश म्हात्रे यांना भिवंडी लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी जाहीर केली आहे. म्हात्रे यांनी आज पुण्यात शरद पवार यांची भेट घेऊन भिवंडीतील समस्यांवर चर्चा केली.

मोफत बस

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने दिव्यांगांना देण्यात येणाऱ्या मोफत बस पासच्या मुदतीत येत्या 31 मेपर्यंत वाढ करण्यात आली आहे. याआधी पहिल्यांदा 28 फेब्रुवारीपर्यंत आणि नंतर 31 मार्चपर्यंत मुदतवाढ करण्यात आली होती. दरम्यान पीएमपी प्रशासनानं गेल्या चार दिवसात दोन हजार २१६ दिव्यांगाना मोफत पासचं वाटप केलं आहे.

**<u>पुणे मनपा</u>**

पुणे शहराला जोडणाऱ्या महामार्गांबरोबरच गर्दीच्या अन्य प्रमुख रस्त्यांवरील खोदाईची कामं येत्या ३० एप्रिलपर्यंत पूर्ण करावी. त्यानंतर १ मे ते ३० सप्टेंबर या कालावधीत शहरात रस्ते खोदाई करता येणार नाही, असं पुणे महापालिकेनं कळवलं आहे. या कालावधीत रस्ते खोदाई करणाऱ्यांवर कारवाई केली जाईल असं पथविभागाचे प्रमुख अनिरुद्ध पावसकर यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितलं. दरम्यान पुणे शहरातील धोकादायक वाडे महापालिकेकडून पावसाळ्यापूर्वी उतरवले जातात. त्यानुसार शहरातील धोकादायक ४६ वाड्यांना पुणे महापालिकेच्या बांधकाम विभागाने नोटीस बजावली आहे.

**यशस्वी**

संशोधनाच्या सहकार्याने धोरणात्मक बदल व्हायला हवेत, असं मत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्रकुलगुरु डॉ. पराग काळकर यांनी आज पुण्यात व्यक्त केलं. व्यवस्थापनातील नाविन्यता आणि माहिती तंत्रज्ञान, या विषयावर यशस्वी संस्थेनं आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. या परिषदेत देश-परदेशातील १३० संशोधन प्रबंध सादर करण्यात आले.

**परिसंवाद**

वास्तवाचं भान ठेवून भविष्यातील मार्ग निवडले, तर यशाचा मार्ग सापडतो, असं प्रतिपादन माजी सनदी अधिकारी आणि माजी संमेलनध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख यांनी काल पुण्यात आळंदी इथं केलं. ज्ञानेश्वर जाधवर यांनी लिहिलेल्या 'आशेच्या गुंगीत लटकलेले तारुण्य' या कादंबरीवरील परिसंवादात देशमुख बोलत होते. एमआयटी अकॅडमी ऑफ इंजिनिअरिंगनं या परिसंवादाचं आयोजन केलं होतं. ज्येष्ठ लेखक समीक्षक प्राचार्य डॉ. आनंद कुलकर्णी, सारिका कुलकर्णी, शरद तांदळे, यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते.

**स्ट्रॉबेरी**

पुण्यातील कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी प्रायोगिक तत्वावर स्ट्रॉबेरीची लागवड करून त्यातून ४ लाख रुपयांची कमाई केली आहे. थंड हवेच्या ठिकाणी उत्पादित केल्या जाणाऱ्या स्ट्रॉबेरीची लागवड शिवाजीनगर परिसरातील सुमारे २० गुंठे जागेवर करून त्यातून ३ टन स्ट्रॉबेरीचं उत्पादन या विद्यार्थ्यांनी घेतलं आहे. स्ट्रॉबेरीच्या यशस्वी लागवडीचा पुण्यातील हा पहिलाच प्रयोग असल्याचं प्रकल्पाचे प्रमुख समन्वयक सुभाष भालेकर यांनी सांगितलं.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान ४० अंश आणि किमान तापमान १९ पूर्णांक ८ दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. उद्याही तापमान साधारण असंच राहण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**